ठाणे, सोमवार दि. २४ जून २०२४ वर्ष : १३, अंक : ५७ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**पुण्यातील ड्रग्ज प्रकरण**
पुण्यात ड्रग्ज प्रकरणे नवी नाहीत. रेव्ह पार्टयांसाठी पुणे कुप्रसिद्ध आहे. पुण्यातील एफसी रोडवरील हॉटेल, पबमध्ये तरुण-तरुणी एन्जॉयमेंटसाठी......पान २ वर

**सायन पनवेल महामार्गावर नवी मुंबई पालिकेची लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीम**
...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**
सोने ७२,६१० | चांदी ९३,५००

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मंत्र्यांची गाडी पाहून महागाईविरोधात हा निदर्शन करत होता. त्याने मंत्री महोदयांचा अपमान केला. म्हणून याला आणले.

**थोडक्यात घडामोडी**

## कोकण पदवीधर निवडणुकीसाठी मतदानाची वेळ सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत

ठाणे – महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर आणि कोकण विभाग पदवीधर विधानपरिषद मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी बुधवार, दि.२६ जून २०२४ रोजी होणाऱ्या मतदानासाठी सकाळी ७.०० ते सायं ६.०० ही नवीन वेळ निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातीलर उपसचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी म.रा.पारकर यांनी दिली. भारत निवडणूक आयोगाने दिनांक २४ मे २०२४ च्या प्रसिध्दी पत्रकानुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर,कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मतदारसंघांकरिता मतदान करण्याची वेळ बुधवार, दिनांक. २६ जून २०२४ रोजी सकाळी ८.०० ते सायं ४.०० अशी निश्चित करण्यात आली होती. परंतू आता भारत निवडणूक आयोगाने दिनांक ०३ जून,२०२४ रोजीच्या पत्रकान्वये लोक प्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम ५६ नुसार पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या मतदानाच्या वेळेमध्ये बदल केलेला आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाच्या बुधवार, दि.२६ जून २०२४ रोजी होणाऱ्या मतदानासाठी सकाळी ७.०० ते सायं ६.०० ही नवीन वेळ निश्चित करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर,कोकण विभाग (पान २ वर)

# मान्सून जूनमधील पावसाची तूट जुलैमध्ये भरुन काढणार



नवी दिल्ली : भारतील शेतकऱ्यांसह सर्वांचं लक्ष मान्सूनच्या पावसाकडे लागलेलं असतं. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मान्सून लवकर भारतात दाखल झाला. मात्र, महाराष्ट्रातील काही भागात पोहोचल्यानंतर मान्सूनचा वेग मंदावला होता. आता भारतीय हवामान विभागानं नव्यानं जारी केलेल्या अंदाजानुसार ३ जूलैपर्यंत मान्सून देशात पुन्हा आगेकूच सुरु करेल. उत्तर पश्चिम भारतात मान्सूनचा पाऊस जोरदार हजेरी लावण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा या राज्यांमध्ये मान्सूची प्रतीक्षा आहे. ११ जून नंतर भारतात मान्सूनचा वेगव मंदावला होता. दोन दिवसांपूर्वी मान्सून मध्य भारताच्या पुढे पोहोचला होता. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन यांनी जुलैच्या पहिल्या आठवड्यात मान्सून पुन्हा गती प्राप्त करेल. त्यावेळी चांगला पाऊस होईल त्यामुळं जूनमध्ये कमी झालेल्या पावसाची जुलैमध्ये भरपाई होईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

### पुढील ३-४ दिवसात कुठं पाऊस होणार?

भारतीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार मान्सून पुढील तीन ते चार दिवसात गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगालमधील काही भाग, बिहारचा काही भाग आणि उत्तर प्रदेशातून पुढे जाईल. या ठिकाणी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २७ जून नंतर उत्तर, पश्चिम आणि मध्य भारतात पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

### मान्सून पुन्हा सक्रीय होत असल्याचं म्हटलं.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार ऑगस्ट मध्ये ला नीना विकसित होण्याची अपेक्षा आहे. तर, अलनिनोमुळं भारतातील मान्सूनच्या पावसावर विपरीत परिणाम होत असतो. अलनिनो निर्माण झाल्यास भारतात मान्सूनचा पाऊस कमी प्रमाणात होतो. हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एम. राजीवन यांनी मान्सून पुन्हा सक्रीय होत असल्याचं म्हटलं. जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मान्सून पोहोचेल. पुढच्या २-३ आठवड्यात चांगल्या पावसाची अपेक्षा आहे. ला नीनाच्या प्रभावामुळं ऑगस्ट महिन्यात चांगला पाऊस होईल, अशी अपेक्षा हवामान विभागाल आहे.

### ३० जूनपर्यंत महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा

मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र काबिज केला आहे. सध्या मान्सूनचा काही प्रमाणात वावर हा घाटमाथ्यावर जाणवू लागला आहे. त्यामुळं आजपासून जूनच्या या शेवटच्या संपूर्ण आठवड्यात म्हणजे ३० जून पर्यंत महाराष्ट्रात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याचे मत ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी व्यक्त केलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून मान्सून खोळंबला होता. जवळपास नऊ दिवस मान्सून नवसारी, जळगाव, मंडला, पेंड्रा रोड, झारसुगुडा, बालासोर, हल्दिया, पाकूर, साहिबगंज रक्सोलपर्यंत पोहोचला होता. पुढील तीन ते चार दिवसात अरबी समुद्राचा उत्तरेकडील भाग, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या काही भागातून पुढे प्रवास करेल.

नीट परीक्षेतील गैरव्यवहार प्रकरणी

**सरकारचा मोठा निर्णय CBI कडे सोपवला तपास!**

# सीबीआयकडून FIR दाखल; पेपरफुटीचे धागेदोरे आता लातूरपर्यंत

नीट पेपरफुटी प्रकरणात दिवसागणिक नवनवीन खुलासे होत आहेत. अशातच काल होणारी नीट पीजी परीक्षा पुढे ढकलण्याचा मोठा निर्णय आरोग्य मंत्रालयानं घेतला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणात बिहार कनेक्शननंतर आता महाराष्ट्र कनेक्शन समोर आलं आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी दोन शिक्षकांना नांदेड एटीएसनं ताब्यात घेतलं आहे. अटक करण्यात आलेल्या दोघांपैकी एकजण लातूरमध्ये तर दुसरा सोलापूर येथे कार्यरत असल्याची माहिती मिळत आहे. दोघेही जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. दरम्यान, नांदेड एटीएसकडून दोघांचीही कसून चौकशी सुरू आहे. या चौकशी अंती या प्रकरणी आता सीबीआय कडून एफआयआर दाखल करण्यात आला आहे. केंद्र सरकारने काल रविवारच्या रात्रीनीट परीक्षेतील गैरव्यवहाराचे प्रकरण सीबीआय ला तपास करण्यासाठी दिले होते. नुकताच या प्रकरणी आता सीबीआय कडून FIR दाखल करण्यात आला आहे.

### चौकशीअंती सीबीआय कडून FIR दाखल

वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या पेपरफुटीचे धागेदोरे आता लातूरपर्यंत पोहोचले आहेत. नांदेडच्या एटीएस पथकानं लातूरमध्ये दोन ठिकाणी छापे टाकून जिल्हा परिषदेच्या दोन शिक्षकांना ताब्यात घेतलं आहे. संजय तुकाराम जाधव आणि जलील उमरखाँ पठाण अशी या शिक्षकांची नावं आहेत. पेपरफुटी प्रकरणात या शिक्षकांचा सहभाग असल्याचा एटीएसला संशय आहे. वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या परीक्षेत घोटाळा झाल्याचा आरोप होत आहे. लातूरमध्येही नीट आणि जेईईच्या तयारीसाठी मोठ्या संख्येनं विद्यार्थी खासगी कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश घेत असतात.

त्यामुळे परीक्षा गैरव्यवहारात या शहराचे काही धागेदोरे आहेत का? या दृष्टीनं तपास सुरू होता. शनिवारी रात्री नांदेड एटीएसच्या हाती हे दोघे शिक्षक लागले. दोघांनाही तात्काळ एटीएसकडून ताब्यात घेण्यात आलं. परिणामी आज केलेल्या चौकशीअंती सीबीआय कडून एफ आय आर दाखल करण्यात आला आहे.

### नीट पीजी परीक्षा पुढे ढकलली

नीट पीजी परीक्षार्थींसाठी मोठी बातमी आहे. आज होणारी नीट पीजी परीक्षा पुढे ढकलण्याचा मोठा निर्णय आरोग्य मंत्रालयाने घेतला आहे. आज नीट पीजी परीक्षा पार पडणार होती, मात्र आता ही परीक्षा होणार नाही. नीट परीक्षेचा मुद्दा गेल्या बऱ्याच काळापासून चर्चेत आहे. अलिकडेच नीट परीक्षेमध्ये घोळ झाल्याचं समोर आलं होतं. त्यानंतर नीट पीजी परीक्षा रद्द करण्याची मागणी करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर खबरदारी घेत शिक्षण विभागाने रविवारी होणारी नीट पीजी परीक्षा पुढे ढकलली आहे.

पहिल्या दहा दिवसांतच यूजीसी नेट परीक्षा रद्द झाली, नीट परीक्षा पेपर फुटल्याने रद्द झाली आणि आता नीटची पदव्युत्तर परीक्षा देखील पुढे ढकलण्यात आली. 'देशाचे भविष्य हे देशाच्या वर्गखोल्यांमध्ये आकार घेत आहे' असे कायम बोलले जाते. मात्र, याच देशाच्या भविष्यासोबत केंद्र सरकार अक्षरशः खेळत आहे. अवघ्या १२ तास आधी परीक्षा रद्द करणे नक्की कशाचे द्योतक आहे ? मुळात अशा प्रवेश परीक्षा राज्य पातळीवर घेण्यात येऊन राज्यांना याबाबतीत अधिक स्वायत्तता दिली जावी. मात्र, केंद्र शासनाला सर्व काही स्वतःच्या हातात ठेवायचे असल्याने या अडचणी उद्भवत आहेत

– जयंत पाटील

आदित्य ठाकरेंनी पत्रकार परिषदेतून देशभरात सुरू असलेल्या सीईटी, नीट आणि नेट परीक्षांतील घोळावर भाष्य केलं. CET च्या परीक्षांसंदर्भात उत्तर द्यायला डायरेक्टर होते, पण त्यांच्याकडे उत्तर नव्हते. विद्यार्थ्यांचे पैसे रिफंड होणार का, असा सवाल उपस्थित करत आदित्य ठाकरेंनी अद्याप उत्तरपत्रिका हातात का नाही देत, असेही म्हटले. तसेच, नीट परीक्षांबाबत जो कोणी चूक आहे, त्यावर कारवाई व्हायलाच हवी, पण होईल असं मला वाटत नाही.

– आदित्य ठाकरे






कोकण पदवीधर मतदारसंघाचे महायुतीचे भाजपाचे उमेदवार ड.निरंजन डावखरे यंदा हॅट्रीक करतील असं प्रतिपादन आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केले. कोकण पदवीधर मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार ड.निरंजन डावखरे यांच्या प्रचारार्थ ठाण्यात विविध ठिकाणी मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. रविवारी ठाण्यातील अनंता बॅंक्वेट हॉल टिकुजिनी वाडी माजिवडा येथे नवयुग मित्र मंडळाच्या वतीने विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार संजय केळकर, उमेदवार निरंजन डावखरे, भाजपा ठाणे जिल्हा सरचिटणीस कैलाश म्हात्रे, भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा स्नेहा पाटील, मा. नगरसेविका स्नेहा आंब्रे, सचिव संदीप लेले, अॅड.अनुराधा परदेशी, ठाणे शहर उपाध्यक्ष रमेश आंब्रे, शिवसेनेचे नितीन लांडगे तसेच सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते, पदवीधर उपस्थित होते. (छाया, मनोज सिंह)

# हज यात्रेकरूंच्या ९६८ सेवेकऱ्यांना कोट्यवधींचा गंडा !

**गुन्हा दाखल करण्यासाठी शानू पठाण यांची पोलीस ठाण्यात**





ठाणे – हज यात्रा करण्यासाठी मक्का येथे जाणाऱ्या भाविकांना सेवा पुरवण्यासाठी मोठ्या प्रमाणात सेवेकऱ्यांची गरज भासते. या सेवेकऱ्यांना चांगले मानधन मिळत असल्याने ठराविक कालावधीसाठी गोरगरीब बेरोजगार तरूण मक्केत जात असतात. मात्र, या सेवेकऱ्यांना कोट्यवधी रूपयांचा गंडा घालून एक जण फरार झाला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करून गोरगरीब तरूणांचे पैसे परत करावेत, अशी मागणी करीत मुंब्रा पोलीस ठाण्यात धडक दिली.

सौदी अरेबियातील मक्का येथे हजयात्रेला जगभरातून मुस्लीम बांधव जात असतात. कोट्यवधी भाविक या ठिकाणी एकत्र येत असल्याने नागरी सेवा देण्यासाठी सौदी सरकारला मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागत असते. त्यासाठी काही एजन्सी अशा पद्धतीने मनुष्यबळ पुरवत असतात. बंगळुरू येथील एक एजन्सी अशाच पद्धतीने सेवेकरी सौदी अरबमध्ये पाठवत असते. त्यासाठी आपले कमिशन म्हणून एका बेरोजगार तरूणाकडून सुमारे ६५ हजार रूपये आकारत आहे. (पान २ वर)

# चित्रपट हे व्यक्तिमत्व घडविण्याचे एक प्रभावी शक्तिकेंद्र -मुनगंटीवार

**मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची थाटात सांगता**




मुंबई – चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याचे ते एक प्रभावी शक्तिकेंद्र आहे आणि चित्रपटसृष्टीतील कलाकार हे या देशाचे खरे कोहीनूर हिरे आहेत असे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी येथे केले. मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या सांगता समारंभात ते शुक्रवारी सायंकाळी बोलत होते.

मुंबईतील एनसीपीए येथे थाटात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात ना. श्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की चित्रपट हा समाजाचा आरसा असतो. जे समाजात सुरू आहे, ते चित्रपटात दिसते. त्यामुळे भारतातला पहिला चित्रपट राजा हरिश्चंद्र होता. कारण तेव्हा समाजात हरिश्चंद्राप्रमाणे वागणारे लोक होते. आज तसे चित्रपट बनत नाहीत कारण आज समाजात कुणी हरिश्चंद्र दिसत नाहीत, असेही ते म्हणाले. भारतीय चित्रपट सृष्टीची सुरूवात महाराष्ट्रातून झाली, एका मराठी माणसाने केली याचा आपल्याला अभिमान वाटतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले.आज येथे जमलेले दिग्गज हे त्यांच्या कलेच्या माध्यमातून आमच्या हृदयात खोलवर शिरकाव करू शकतात, जिथे कदाचित डॉक्टरही पोहोचू शकत नाहीत, अशी त्यांच्या कलेची ताकद आहे, असे ना.श्री. सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

चित्रपटांचा मनुष्याच्या जडणघडणीवर, मानसिकतेवर मोठा प्रभाव पडतो. मनुष्याचे जीवन घडविण्याचे, व्यक्तिमत्त्व घडविण्याचे सामर्थ्य चित्रपट या माध्यमात आहे, असे सांगून ना. श्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की एखाद्या चित्रपटातील एखादा संवाद, एखादे गीत किंवा गीताचे एकादे कडवेही एखाद्या व्यक्तीला जीवनाचा मार्ग दाखवून जातात अशी उदाहरणे आपण पाहतो. हे घडविणारे चित्रपट सृष्टीतील निर्माते दिग्दर्शक पटकथाकार कलाकार व पडद्यामागचे कलाकार हे सर्वच या देशाचे खरे कोहीनूर आहेत. म्हणून चित्रपट सृष्टीने या सामर्थ्याची जाणीव ठेवली पाहिजे. आपण सर्वांनी मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातून परत जाताना या चित्रपट सृष्टीच्या माध्यमातून देशाभिमान आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान जागविण्याचा संकल्प करूया असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या माध्यमातून एक चांगले प्रभावशावी आयोजन केल्याबद्दल त्यांनी केंद्र सरकारचे आभार मानून कौतुक केले. यावेळी ना.श्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते चित्रपट सृष्टीतील शेखर सुमन, शाजी करूण, सुब्बय्या नल्लमुथू, पूनम ढिल्लन, छाया कदम, मी बारुआ अक्षय ऑबेरॉय आणि विशाल आदी दिग्गजांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे ज्यूरी प्रमुख श्री भारत बाला, (पान २ वर)

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## पुण्यातील ड्रग्ज प्रकरण

पुण्यात ड्रग्ज प्रकरणे नवी नाहीत. रेव्ह पार्टयांसाठी पुणे कुप्रसिद्ध आहे. पुण्यातील एफसी रोडवरील हॉटेल, पबमध्ये तरुण–तरुणी एन्जॉयमेंटसाठी येतात, ते ड्रग्ज व अंमली पदार्थांचे सेवन करत पार्टी करतात, असा आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. यावरून राजकीय वादाला तोंड फुटले आहे. पुण्यात एका आमदाराच्या पुतण्याने मध्यरात्री बेदरकारपणे गाडी चालवत एका दुचाकीला उडवल्याची भीषण घटना घडली. त्यानंतर, पुन्हा एकदा पुण्यातील मध्यरात्री सुरू असलेल्या पब्ज आणि बारचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यासोबत, पुण्यात अवैधपणे विक्री होत असलेल्या ड्रग्ज आणि अंमली पदार्थांच्या वापरावरुनही राजकीय युद्ध सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी ड्रग्जप्रकरणावरुन अनेक गंभीर आरोप केले आहेत. उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांच्यासह संबंधित एक्साईज अधिकारी कोट्यवधींचा हप्ता घेतला असल्याचा गंभीर आरोप सुषमा अंधारे यांनी केला आहे. शंभूराज देसाई यांनीही प्रतिक्रिया दिली असून आता कारवाईला गती मिळाली आहे. पुण्याच्या एका हॉटेलमधील व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिस व उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करत ५ जणांना ताब्यात घेतले आहे. आरोप – प्रत्यारोपानंतर ड्रग्जवरील कारवाईला वेग आला आहे. पुण्यातील एका हॉटेलमधील पार्टीत ड्रग्स घेणाऱ्या तरुणांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यामध्ये, हॉटेलमधील वॉश रुममध्ये टॉयलेटजवळ बसून ते ड्रग्ज घेत असल्याचे दिसून येतात. या युवकांकडील हे ड्रग्ज, मॅफेनड्रग्स असल्याचे प्राथमिक माहितीमधून समोर आले आहे. त्यामुळे, पुण्यातील ललीत पाटील प्रकरणात आलेले ड्रग्जप्रकरण अजून शांत झाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी, पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ५ जणांना ताब्यात घेतलं असून अधिक तपास सुरू आहे. या ५ जणांमध्ये हॉटेलचा मालकही ताब्यात आहे. या व्यतिरिक्त या ठिकाणी असलेला एक मॅनेजर आणि एक कर्मचारी सुद्धा ताब्यात घेण्यात आला आहे. या हॉटेलचे ३ पार्टनर देखील पोलिसांच्या ताब्यात असून संतोष कामठे, रवी माहेश्वरी, मानस मलिक, योगेंद्र आणि शर्मा असे ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. आता, या प्रकरणावरुन राज्यातील राजकारण तापले असल्याचे दिसते. पुण्यातील ड्रग्ज प्रकरणी सुषमा अंधारे आणि आमदार रविंद्र धंगेकर आक्रमक झाले आहेत. त्यानंतर, पोलिसांनी कारवाईला वेगाने सुरुवात केली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने संपूर्ण हॉटेलची तपासणी केली. ड्रग्ज प्रकरणासंदर्भात पोलिसांनी माहिती गोळा करण्यात आल्याची माहिती आहे. सुषमा अंधारे यांनी ज्यांच्यावर बार मालकांकडून हफ्ते घेत असल्याचा आरोप केला, ते एक्साईज विभागाचे अधिकारी चरण सिंग राजपूत यांनीही पुण्यातील त्या हॉटेलला भेट दिली. एक्साईज विभागाकडून देखील कारवाईला सुरुवात झाली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेचे पोलीस सहायक, पोलीस आयुक्त सतीश गोवेकर घटनास्थळी दाखल असून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. पुणे पोलीस आणि गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाकडून या संपूर्ण पार्टीचे विश्लेषण सुरू आहे. दरम्यान, पार्टी झालेल्या लिक्विड लीजर लाउंज या हॉटेलमधील सीसीटीव्हीचे डीव्हीआर पुणे पोलिसांनी जप्त केले. या प्रकरणी आठ ते नऊ महिन्यापासून पुण्यातल्या ड्रग्ज प्रकरणावर सुषमा अंधारे सातत्याने भूमिका मांडत आहेत. या प्रकरणी शंभूराजे देसाई यांनी तात्काळ आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला पाहिजे. त्याशिवाय शंभूराजे देसाई यांच्यासाठी फक्त काम करणारे राजपूत यांचे निलंबन झाले पाहिजे. या दोन गोष्टी झाल्याशिवाय पुणे सुधारू शकत नाही. महाराष्ट्रातील ड्रग्जचा विळखा त्याशिवाय नष्ट होऊ शकत नाही, अशी मागणी सुषमा अंधारे यांनी केली आहे. पुण्यात ड्रग्ज प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या काही वर्षांत पुण्यातील पाबचालक, बार मालक व रेव्ह पार्टयां यांवर ना राज्य सरकारचे लक्ष आहे ना पोलीस खात्याचे ! पोर्श अपघात प्रकरणी पुणे बदनाम झाले. या प्रकरणी आरोपीला वाचवण्यासाठी सुरुवातीला पोलीस व काही राजकारण्यांनी आणि रुग्णालय प्रशासनानेही प्रयत्न केले. काही जणांनी या प्रकरणातील पुरावे नष्ट करण्याचे प्रगतन केले. या प्रकरणातील अल्पवयीन आरोपी मद्यधुंद झाला होता. असे असताना ड्रग्ज रॅकेट उघडकीस आले आहे. पुण्यातील सांस्कृतिक शहर ही ओळख आता यामुळे नष्ट होईल की काय, अशी परिस्थिती उद्धवली आहे. पुण्यातील गुन्हेगारी प्रकरणामुळे पुण्याची सांस्कृतिक ओळख नष्ट होत चालली आहे. आणि पुण्याची प्रतिमा सुधारणे पोलीस, राजकारणी व राज्य सरकारची आहे. त्यामुळे राज्य सरकार अशा वाईट कृत्यांना रोखणार का असा प्रश्न निर्माण होत आहे.

### कचरा व्यवस्थापन करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी हायवे लगतच्या ग्रामपंचायतींना दिली भेट

# कचरा समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायतींनी कायमस्वरूपी उपाययोजना करा -मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

ठाणे – ठाणे जिल्ह्यातील शहरालगत व हायवेलगतच्या ग्रामपंचायती मधील घनकचरा व्यवस्थापनाबाबत ठाणे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. भिवंडी, कल्याण, शहापूर, अंबरनाथ तालुक्यातील डंपिंग ग्राऊंड, घनकचरा प्रकल्प, हायवेलगतच्या ग्रामपंचायती या ठिकाणी भेट देऊन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करण्यात आले.

ठाणे ग्रामीण भागात कचऱ्याची समस्या मोठी आहे. कचऱ्याच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा. ग्रामपंचायती अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे विविध प्रकारे विल्हेवाट करणे तसेच कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामस्थांनी देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

भिवंडी तालुक्यातील हायवे लगतच्या दिवे अंजुर, मानकोली, वडपे, पडघा आणि कोण या ग्रामपंचायतींना भेट देऊन तेथील घनकचरा व्यवस्थापनाबाबत व डम्पिंग ग्राउंड येथे प्रत्यक्षात भेटी दिल्या. ग्रामपंचायत अंतर्गत कायमस्वरूपी घनकचरा व्यवस्थापन करणे बाबत सक्त सूचना



यावेळी देण्यात आल्या. शहापूर तालुक्यातील बोर शेती, वाफे आणि चेअरपोली ग्रामपंचायत भेट देऊन तेथील डम्पिंग ग्राउंडला भेट दिली. शहरालगत आणि हायवे लगतच्या ग्रामपंचायतीं मधील घनकचरा व्यवस्थापनाबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करणे बाबतही उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांच्यासमवेत चर्चा करण्यात आली. शहापूर तालुक्यातील दहिगाव येथील जेएसडब्ल्यू अंतर्गत कार्यरत असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास देखील भेट देऊन तेथील प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. यावेळी प्रकल्प संचालक अतुल पारस्कर, भिवंडी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ. प्रदीप घोरपडे, विस्तार अधिकारी उप अभियंता रमेश सासे तसेच अमृत इंटरप्राईजेस संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. कल्याण तालुक्यातील म्हारळ, वरप ग्रामपंचायतींना भेटी देण्यात आल्या. म्हारळ ग्रामपंचायत येथील नाला सेतू ट्रीटमेंट प्लांट येतील काम त्वरित पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. वरप ग्रामपंचायत अंतर्गत तात्काळ कचरा संकलन केंद्र उभारणीसाठी नियोजन करण्यात यावे अशा सूचना गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते यांना देण्यात आल्या.

तसेच अंबरनाथ तालुक्यातील ग्रामपंचायत नेवाळी व उसाटणे येथे भेट देण्यात आली. उसाटणे येथील कचरा व्यवस्थापन केंद्राला भेट देऊन कामकाज वेळेत पूर्ण करावे असे आदेश देण्यात आले. ग्रामपंचायत नेवाळी येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नेवाळी नाका येते प्रत्यक्ष पाहणी करून हायवे लगत कचरा टाकण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सक्त सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या. हायवे लगत कचरा टाकणाऱ्या ग्रामस्थांसाठी, शहरा लगत व हायवे मार्गे प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये कचरा संकलन केंद्र उभारावे जेणेकरून कचरा अस्तव्यस्त न पडता एकत्रित जमा करता येईल. कचऱ्यावर पुढील प्रक्रिया व व्यवस्थापन करणे सुलभ होईल असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले.

# विधानपरिषदेच्या पदवीधर कोकण मतदारसंघ निवडणुकीसाठी मत नोंदविण्याबाबत महत्त्वाच्या सूचना

ठाणे, – विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदार संघासाठी येत्या २६ जून २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत पसंतीक्रमानुसार मत द्यायचे आहे. त्यामुळे कोकण पदवीधर मतदार संघातील मतदारांनी मत नोंदविण्याची प्रक्रिया समजून घेऊन मतदान करावे, असे आवाहन कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे. भारत निवडणूक आयोगाने मुंबई पदवीधर. कोकण विभाग पदवीधर, व मुंबई शिक्षक मतदार संघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर केला आहे. यासाठी दि. २६ जून २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान कसे करावे, याबाबत मार्गदर्शक सूचना मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघ सहा. निवडणूक निर्णय अधिकारी कोकण विभाग तथा मा.उप आयुक्त (सा.प्र) अमोल यादव यांनी दिल्या आहेत.

विधानपरिषदांच्या निवडणुकीसाठी मत नोंदविण्याबाबत महत्वाच्या सूचना– अ) मतदानाची कार्यपध्दती– मतदान करण्यासाठी केवळ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतपत्रिकेसोबत पुरविलेला जांभळ्या रंगाचा स्केचपेन वापरावा. याशिवाय मतपत्रिका अवैध ठरेल असे इतर कुठलेही पेन, पेन्सिल, बॉलपॉईन्ट पेन किंवा इतर चिन्हांकित करावयाची साधने वापरू नयेत. पसंतीक्रम या स्तंभामध्ये, ज्यास पहिला पसंतीक्रम देण्यासाठी निवडले आहे, त्या उमेदवाराच्या नावासमोर '१' हा अंक नमूद करुन त्यास मतदान करता येईल. '१' हा अंक केवळ एका उमेदवाराच्या नावासमोर नमूद करता येईल. जरी निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या एका पेक्षा जास्त असेल तरी '१' हा अंक केवळ एकाच उमेदवाराच्या नावासमोर नमूद करता येईल. निवडून द्यावयाच्या उमेदवारांच्या संख्येव्यतिरिक्त जेवढे उमेदवार निवडणूक लढवित आहेत, तेवढे पसंतीक्रम नोंदविता येतील. उदा. जर ५ उमेदवार निवडणूक लढवित असतील आणि फक्त १ उमेदवार निवडून द्यावयाचा असेल तर तुम्ही तुमच्या निवडीप्रमाणे १ ते ५ पसंतीक्रम देऊ शकता. उर्वरित उमेदवारांच्या नावासमोर पुढील पसंतीक्रम २, ३, ४ इत्यादी अंक पसंतीक्रमानुसार पसंतीक्रम (Order of Preference) या स्तंभामध्ये दर्शविता येईल. कोणत्याही उमेदवारांच्या नावासमोर केवळ एकच अंक नमूद केला जाईल, याची खात्री करावी आणि एकसमान अंक एका पेक्षा जास्त उमेदवारांच्या नावा समोर नमूद केले नसल्याची सुद्धा खात्री करावी.

## चित्रपट हे व्यक्तिमत्व घडविण्याचे एक प्रभावी शक्तिकेंद्र –मुनगंटीवार

**(पान १ वरून)** मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे राष्ट्रीय ज्युरी प्रमुख श्री अपूर्व बक्षी यांनीदेखील यावेळी आपली मते मांडली.

यावेळी मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय माहितीपटासाठीचा सुवर्ण शंख पुरस्कार निष्ठा जैन दिग्दर्शित गौल्डन थ्रेड या माहितीपटाला देण्यात आला. तर रौप्य शंख पुरस्कार सर्वोत्कृष्ट लघुपट ठरलेल्या द सोअर मिल्क या इस्टोनियन लघुपटास देण्यात आला. सर्वोत्कृष्ट निमेशन फिल्मसाठीचा रौप्य शंख पुरस्कार पोलंडच्या झीमा या निमेशनपटाने पटकावला. आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील ज्युरींचा विशेष पुरस्कार मॅट वेल्डेक यांच्या लव्हली जॅक्सन या लघुपटाने मिळवला तर सर्वोत्कृष्ट ध्वनी संयोजनाचा तांत्रिक पुरस्कार नीरज गेरा आणि अभिजीत सरकार यांना विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट चित्रपट संपादनाचा पुरस्कार विघ्नेश कुमुलाई आणि इरीन दार मलिक यांना विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट चित्रिकरणाचा पुरस्कार (सिनेमॅटोग्रीफी) बाबीन दुलाल आणि सूरज ठाकूर यांना विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट प्रायोगिक चित्रपटासाठीचा प्रमोद पाटी पुरस्कार जपानी चित्रपट द यंग ओल्ड क्रो या चित्रपटास देण्यात आला. सर्वोत्कृष्ट भारतीय माहितीपटासाठीचा रौप्य शंख पुरस्कार ६–ए आकाशगंगा या माहितीपटास तर सर्वोत्कृष्ट भारतीय लघुपटासाठीचा रौप्य शंख पुरस्कार सॉल्ट या लघुपटास देण्यात आला. सर्वोत्कृष्ट भारतीय निमेशन फिल्मसाठीचा रौप्य शंक पुरस्कार निर्जरा या चित्रपटाने पटकावला. तर राष्ट्रीय स्पर्धेतील ज्युरींचा विशेष पुरस्कार अ कोकोनट ट्री या चित्रपटास देण्यात आला.

२०२४ मधील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पणासाठीचा दादासाहेब फाळके चित्रनगरी पुरस्कार श्रीमोयी सिंग यांना टूवर्डस हॅप्पी अल्येज या चित्रपटासाठी देण्यात आला. याच चित्रपटाला आंतरराष्ट्रीय ज्यूरी समिक्षणाचा पुरस्कारही देण्यात आला. सर्वोत्कृष्ट विद्यार्थी चित्रपटाचा आयडीपीए पुरस्कार चांचिसोआ (अपेक्षा) या गारो भाषेतील चित्रपटास देण्यात आला. तर इंडिया इन अमृतकाल या विभागांतर्गत सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार लाईफ इन लूम या चित्रपटास देण्यात आला.मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे प्रबंधक, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे अधिकारी यांच्यासोबतच राज्याचे सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव व मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्री विकास खारगे आणि राज्य सांस्कृतिक कार्य विभागाचे इतर वरीष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे संचालक श्री पितुल कुमार यांनी आभार मानले.

## हज यात्रेकरूंच्या ९६८ सेवेकऱ्यांना कोट्यवधींचा गंडा !

**(पान १ वरून)** या एजन्सीचा मुंब्रा येथील दलाल मोहम्मद आदिल आणि त्याचे साथीदार रफत सैय्यद, रोनक परवीन, शेहबाज शाहनवाज सैय्यद, मोहम्मद रफिक, मोहम्मद हनीफ गौडा यांनी व्हिसा, सौदी येथील निवासखर्च यासाठी मुंब्रा येथील सुमारे ३०० तरुणांकडून प्रत्येकी ३५ हजार ते ६५ हजार या प्रमाणे १ कोटी ९५ लाख रूपये उकळले आहेत. तर सबंध महाराष्ट्रातून ९६८ तरुणांकडून ६ कोटी २९ लाख २० हजार रूपये उकळून पोबारा केला आहे. ही एजन्सी बंगळुरू येथे असून या एजन्सीने देशभर असा घोटाळा केला असल्याचा संशय मा. विरोधीपक्ष नेते शानू पठाण यांनी व्यक्त केला आहे.

रविवारी शानू पठाण यांनी फसवणूक झालेल्या ३०० तरूणांना घेऊन मुंब्रा पोलीस ठाणे गाठले. तिथे जाऊन त्यांनी संबधित भामट्यावर गुन्हा दाखल करण्याचा आग्रह धरला. त्यांनी या संदर्भात पोलीस उपायुक्तांशीही चर्चा केली. सध्या दिसत असलेला हा घोटाळा हिमनगाचे एक टोक असून देशभरातील बेरोजगार तरूणांची फसवणूक झालेली असून अशी फसवणूक झालेल्यांनी पोलिस आणि आपल्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले. दरम्यान, पोलिसांकडून या प्रकरणाची चौकशी सुरू केली असून चौकशीनंतर गुन्हा दाखल करण्यात येईल, असे मुंब्रा पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले.

## कोकण पदवीधर निवडणुकीसाठी मतदानाची वेळ सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत

**(पान १ वरून)** पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी जास्तीत जास्त पदवीधर मतदारांनी मतदान करावे या उद्देशाने मतदानाची वेळ वाढवून देण्यात आली असून दिनांक २६ जून,२०२४ रोजी पदवीधर व शिक्षक मतदारांनी मोठ्या संख्येने व उत्साहाने आपल्या मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन उपसचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी म.रा. पारकर यांनी केले आहे.

### जाहिर निवेदन

नाव :– रविंद्र रामचंद्र बोर्गे
पत्ता :– ए ७०४ रिवर व्यू कॉ. ऑप. हौ. सो., रामचंद्र नगर–२, वैती वाडी, ठाणे

मी **रविंद्र रामचंद्र बोर्गे** मृत अधिकृत शिधावाटप दुकानदार **रामचंद्र कृष्णा बोर्गे** यांचा पुत्र जाहीर निवेदन करीत आहे की, **रामचंद्र कृष्णा बोर्गे** यांचे दिनांक ०३/०४/२०२४ रोजी निधन झालेले असून त्यांचे नावे असलेले अधिकृत शिधावाटप दुकान क्र ३५ फ १५१ चे प्राधिकारपत्रात मी कायदेशीर वारस ठरत असल्यामुळे वारसाहक्काने माझे नावे होण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप फ परिमंडळ, ठाणे यांचेकडे अर्ज सादर केला आहे. यास कोणाची हरकत असल्यास सदर सूचना प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत उपनियंत्रक शिधावाटप फ परिमंडळ, ठाणे यांचेकडे त्यांचे हरकती बाबत लेखी कळवावे. अन्यथा/त्यानंतर कुणाचीही हरकत नाही असे समजण्यात येईल. याची कृपया संबंधितांनी या सूचनेद्वारे नोंद घ्यावी.

सही/–
दिनांक :– २२/०६/२०२४

---

Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor, Administrative Office "B" Govt. Offices Complex, Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

### Public Notice

Service Request Number : PLG/01385/18/24
Inquiry/case No. : . **ACC/259/2024**
Name of the Trust : **SUVARNA CHARITABLE TRUST**
**Address of the Trust : C/O, ANANT MORE, ROOM NO. B/6, BALLALESHWAR NIWAS, HOUSE TAX NO. VR01/486/13, VIRAR (EAST), BEHIND RAMU COMPOUND, PALGHAR, VASAI, VASAI**
**Registration Number of the Trust (if)** : SUVARNA CHARITABLE TRUST
**Name of the Applicant :** AMIT ANANT MORE

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 21/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar

---

Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor, Administrative Office "B" Govt. Offices Complex, Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

### Public Notice

Service Request Number : PLG/01261/18/24
Inquiry/case No. : . **ACC/254/2024**
Name of the Trust : **HANFIYA RAZVIYA ISLAMIC AND SOCIAL WEFARE TRUST**
**Address of the Trust : C/O, MOHAMMED HANIF DHADA, ROOM NO. 105, VRUSHABH APARTMENT, TEMBHODE ROAD, PALGHAR, OPPOSITE PHILLA HOSPITAL PALGHAR, PALGHAR, PALGHAR**
**Registration Number of the Trust (if)** : HANFIYA RAZVIYA ISLAMIC AND SOCIAL WEFARE TRUST
**Name of the Applicant :** MOHMED HANIF ABDUL SAKOOR DHADA

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 21/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar

---

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN/00725/18/24
Inquiry/case No. : ACC/III/186/2024
Name of the Trust : **दुर्गा माता चॅरिटेबल ट्रस्ट**
**Address of the Trust : बॅरक नं.१२२ समोर, तेजुमल चक्कीच्या जवळ, न्यू धोबीघाट, उल्हासनगर १, ठाणे, ठाणे, उल्हासनगर, उल्हासनगर**
**Name of the Applicant : श्री. हरीश श्यामलाल कनोजिया**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 11/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पद
१ मेकॅनिकल इंजिनिअर
२ इलेक्ट्रिकल इंजिनिअर
३ इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर
४ सिव्हिल इंजिनिअर
५ केमिकल इंजिनिअर
६ सिनियर ऑफिसर (CGD)
७ सिनियर ऑफिसर (CGD) Projects
८ सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर (Non-Fuel Business)
९ सिनियर मॅनेजर (Non-Fuel Business)
१० मॅनेजर (Technical)
११ मॅनेजर (Sales- RD Product Commercialisation)
१२ डेप्युटी जनरल मॅनेजर (Catalyst Business Development)
१३ चार्टर्ड अकाउंटेंट (CA)
१४ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
१५ IS ऑफिसर
१६ IS सिक्योरिटी ऑफिसर- Cyber Security Specialist
१७ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर

■ शैक्षणिक पात्रता: UR/OBC/EWS: ६०% गुण, SC/ST/PWD:५०% गुण
पद क्र.१: मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.२: इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग पदवी
पद क्र.४: सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.५: केमिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ०२/०५ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ११ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Polymer /Plastics Engineering) (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.१२: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) १८ वर्षे अनुभव
पद क्र.१३: CA
पद क्र.१४: (i) M.Sc. (Chemistry (-nalytical/ Physical / Organic/Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१५: (i) B.Tech. (Computer Science/ IT Engineering) / MCA किंवा डाटा सायन्स पदव्युत्तर पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Computer Science/ Information Technology/ Electronics Communications Engineering/ Information Security)/ MCA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.१७: (i) M.Sc. (Chemistry-Analytical / Physical / Organic/ Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ते ५: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.६ ७: २८ वर्षांपर्यंत
पद क्र.८: २९/३२ वर्षांपर्यंत
पद क्र.९: ३८ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: ३४ वर्षांपर्यंत
पद क्र.११: ३६ वर्षांपर्यंत
पद क्र.१२: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.१३: २७ वर्षांपर्यंत
पद क्र.१४ १७: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.१५: २९ वर्षांपर्यंत
पद क्र.१६: ४५ वर्षांपर्यंत

■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ Fee: General/OBC-NC/EWS: ११८०/- SC/ST/PWD: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ वेबसाईट: https://www.hindustanpetroleum.com/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx

## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./ M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./ B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc.(Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/ DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

## सीमा सुरक्षा दल

■ पद क्र.
१ सब इंस्पेक्टर (Master)
२ सब इंस्पेक्टर (Engine Driver)
३ हेड कॉन्स्टेबल (Master)
४ हेड कॉन्स्टेबल (Engine Driver)
५ कॉन्स्टेबल (Crew)
६ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Mechanic (Diesel/Petrol Engine)
७ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Electrician
८ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) -C Technician
९ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Electronics
१० हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Machinist
११ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Carpenter
१२ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Plumber
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 2nd क्लास मास्टर प्रमाणपत्र
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 1st क्लास इंजिन ड्रायव्हर प्रमाणपत्र
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) सेरंग प्रमाणपत्र
पद क्र.४: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 2nd क्लास इंजिन ड्रायव्हर प्रमाणपत्र
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण (ii) 265 HP च्या खाली बोट चालवण्याचा एक वर्षाचा अनुभव (iii) कोणत्याही मदतीशिवाय खोल पाण्यात पोहणे माहित असले पाहिजे.
पद क्र.६ ते १२: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI डिप्लोमा Motor Mechanic (Diesel/Petrol Engine), Electrician, AC Technician, Electronics, Machinist, Carpentry Plumbing
■ वयाची अट: SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ २: २२ ते २८ वर्षे
पद क्र.३ ते १२: २० ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: SC/ST: फी नाही
पद क्र.१ २: General/OBC/EWS: २००/-
पद क्र.३ ते १२: General/OBC/EWS: १००/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०१ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/

## आयबीपीएस भरती

■ जागा : ९९९५ जागा
■ पदाचे नाव:
१ ऑफिस असिस्टंट (Multipurpose)
२ ऑफिसर स्केल-I
३ ऑफिसर स्केल-II (General Banking Officer)
४ ऑफिसर स्केल-II (IT)
५ ऑफिसर स्केल-II (C-)
६ ऑफिसर स्केल-II (Law)
७ ऑफिसर स्केल-II (Treasury Manager)
८ ऑफिसर स्केल-II (Marketing Officer)
९ ऑफिसर स्केल-II (-griculture Officer)
१० ऑफिसर स्केल-III
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.२: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.३: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) ५०% गुणांसह पदवी (Electronics/ Communication/Computer Science/ Information Technology) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.५: (i) CA (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.६: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) CA/MBA (Finance) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.८: (i) MBA (Marketing) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.९: (i) ५०% गुणांसह पदवी (Agriculture/ Horticulture/ Dairy/ Animal Husbandry/ Forestry/ Veterinary Science/ Agricultural Engineering/ Pisciculture) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०५ वर्षे अनुभव
वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते २८ वर्षे
पद क्र.२: १८ ते ३० वर्षे
पद क्र.३ ते ९: २१ ते ३२ वर्षे
पद क्र.१०: २१ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी :
पद क्र.१: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD/ExSM²: १७५/-
पद क्र.२ ते १०: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD: १७५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २७ जून २०२४
■ परीक्षा:
पूर्व परीक्षा: ऑगस्ट २०२४
एकल/मुख्य परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
■ अर्ज
पद क्र.१: https://ibpsonline.ibps.in/rrb13oamay24/
पद क्र.२ ते १०: https://ibpsonline.ibps.in/rrbxiiimay24/

# वयाच्या पंचविशीनंतर दुधात पाणी मिसळून का प्यावे?

तुम्ही तरुण असताना सहज दुर्लक्ष करू शकता अशा निरोगी सवयी तुम्ही वाढत्या वयानुसार स्वीकारल्या पाहिजेत. आपल्या सर्वांना चांगला आहार आणि नियमित व्यायामाचे महत्त्व माहीत आहे. परंतु, काही तज्ज्ञांच्या मते आपण सामान्य दुधाऐवजी पाणी मिसळलेले दूध पिण्याचा विचार केला पाहिजे, हे तुम्हाला माहिती आहे का? पोषणतज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञ, अदीबा इक्राम सैय्यद यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यात नमूद केले आहे की, २० किंवा २५ वर्षे वयापर्यंत दूध प्या. त्यानंतर दूध पिऊ नका, त्यात पाणी मिसळून मग प्यायले पाहिजे.

याबाबत द इंडियन एक्स्प्रेला सविस्तर माहिती देताना इंसिड्स फार्म येथील मार्केटिंगचे व्हीपी, तमल चॅटर्जी म्हणाले, आहारच्या सवयी, जीवनशैली आणि अनेक स्त्रोतांकडून पोषण आहार घेतल्याने दुधावरील अवलंबित्व कमी होऊ शकते. दूधात पाणी मिसळल्याने संवेदनशीलता असलेल्यांना पचायला सोपे जाते.

## दूधात पाणी मिसळल्याने त्याच्या पौष्टिक मूल्यावर कसा परिणाम होतो?

दूधात पाणी मिसळल्याने प्रामुख्याने कॅलरी, फॅट्स, प्रथिने आणि कॅल्शियम प्रति सर्व्हिंगच्या प्रमाणावर परिणाम होतो. स्निग्ध पदार्थांचे प्रमाण कमी झाल्यास काही जीवनसत्त्वांच्या सेवनावर पाणी मिसळण्याचा थोडासा परिणाम होऊ शकतो, परंतु दुधाच्या पौष्टिक मूल्यावर एकंदरीत परिणाम साधारणपणे माफक असतो, असे चॅटर्जी यांनी स्पष्ट केले.

दुधामध्ये पाणी मिसळल्यानंतरही व्यक्ती संतुलित आहार घेऊन त्यांच्या पौष्टिक गरजा पूर्ण करत आहेत हे सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे, असे चॅटर्जी यांनी सांगितले आहे.

दुधात पाणी मिसळल्याने कॅल्शियमचे शोषण आणि हाडांच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो?

दुधात पाणी मिसळल्याने कॅल्शियमचे शोषण थेट बिघडत नाही, त्यामुळे कॅल्शियमचे सेवन कमी होऊ शकते. चॅटर्जी यांनी सुचविले की, हाडांच्या आरोग्यास समर्थन देण्यासाठी व्यक्तींनी त्यांच्या कॅल्शियमच्या गरजा संतुलित आहाराद्वारे पूर्ण केल्या आहेत याची खात्री करणे आवश्यक आहे; ज्यात कॅल्शियम समृद्ध अन्नाचे इतर स्त्रोत समाविष्ट आहेत, जसे की, हिरव्या भाज्या आणि आवश्यक असल्यास पूरक आहार घेऊ शकता.

दीर्घकालीन आरोग्य स्थिती असलेल्या व्यक्तींच्या आहारात पाणी मिसळलेले दूध कसे फायदेशीर ठरते?

मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदयविकार यांसारख्या दीर्घकालीन स्थिती असलेल्या व्यक्तींसाठी पाणी मिसळलेले दूध त्यांच्या आहारातील गरजा पूर्ण करण्यासाठी कमी-कॅलरी, कमी-सोडियम आणि कमी-सॅच्युरेटेड फॅट्सचा पर्याय देऊ शकते, असे चॅटर्जी यांनी नमूद केले.

चॅटर्जी म्हणाले की, कमी फॅट्सयुक्त निवडा आणि त्यात पाणी मिसळल्याने कॅल्शियम आणि पोटॅशियमसारख्या आवश्यक पोषक तत्वांचा पुरवठा करताना रक्तातील साखर, रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करण्यात मदत होऊ शकते. पण, पाणी मिसळलेले दूध त्यांच्या एकूण आहार योजनेत उपयुक्त ठरते का याची खात्री करण्यासाठी व्यक्तींनी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

## जे लोक पाणी मिसळलेले दूध पिण्यास प्राधान्य देतात, त्यांनी हे लक्षात ठेवा?

एखाद्याला एक भाग पाणी ते एक भाग दूध यासारख्या पुराणमतवादी सौम्यता गुणोत्तराने सुरुवात करून चव आणि पौष्टिक गरजांवर निश्चत करू शकता. काहींना दुधाची चव आवडते, तर काहींना पाणी मिसळल्यानंतर सौम्य झालेली दुधाची चव आवडते. एखाद्याचे शरीर कसे प्रतिक्रिया देत आहे याकडे लक्ष देणे आणि सुरक्षिततेसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणेदेखील महत्त्वाचे आहे, अशी शिफारस चॅटर्जी यांनी केली आहे.

# अफगाणने कांगारुंना चिरडले

राशिद खानच्या नेतृत्वाखाली अफगाणिस्तान संघाने टी-२० विश्वचषक स्पर्धेतील सर्वात मोठा उलटफेर केला आहे. त्यांनी रविवारी (दि. २३) सुपर ८ फेरीच्या सामन्यात वर्ल्ड चॅम्पियन ऑस्ट्रेलियावर २१ धावांनी मात करत पराभवाची धूळ चारली. गुलाबदिन नायबने ४ बळी घेतले. तर नवीन-उल-हकने ३ बळी घेतले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अफगाणिस्तानचा ऑस्ट्रेलियाविरुद्धचा हा पहिला विजय ठरला आहे.

किंग्सटाउन येथील अर्नोस वेल मैदानावर नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने रहमानुल्ला गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांच्या अर्धशतकांच्या जोरावर निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून १४८ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारली. गुरबाजने ४९ चेंडूंचा सामना करत ६० धावा केल्या. त्याने ४ चौकार आणि ४ षटकार मारले. तर झद्रानने ५१ धावांची खेळी केली. त्याने ४८ चेंडूंचा सामना करताना ६ चौकार मारले. यादरम्यान ऑस्ट्रेलियाकडून पॅट कमिन्सने ३ बळी घेतले. डम झाम्पाने २ बळी घेतले.

ऑस्ट्रेलियाने अफगाणिस्तानसमोर गुडघे टेकले

१४९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाची या सामन्यात खूपच खराब सुरुवात झाली. पहिल्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर ट्रॅव्हिस हेड खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. कर्णधार मिचेल मार्श काही विशेष कामगिरी करू शकला नाही आणि केवळ १२ धावा करून नवीन उल हकचा बळी ठरला. सहाव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर डेव्हिड वॉर्नरच्या रूपाने ऑस्ट्रेलियाला तिसरा धक्का बसला. पॉवर प्लेअखेर कांगारू संघाची धावसंख्या ३ बाद ३३ अशी झाली. येथून पुढे ग्लेन मॅक्सवेलने एका टोकाकडून डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला ज्यामध्ये त्याला मार्कस स्टॉइनिसची साथ लाभली. या दोघांमध्ये चौथ्या विकेटसाठी ३९ धावांची भागीदारी झाली असताना पण गुलबदिन नायबने स्टॉइनिसची विकेट घेत (१७ चेंडूत ११ धावा) ही जोडी फोडली. ही भागीदारी तुटल्याने अफगाणिस्तान संघाला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी मिळाली. पुढे त्यांनी ८५ धावांतच कांगारूंचा निम्मा संघ पॅव्हेलियनमध्ये पाठवला.

ग्लेन मॅक्सवेलने ४१ चेंडूत ५९ धावा केल्यानंतर महत्त्वाच्या क्षणी आपली विकेट गमावली. तो पॅव्हेलियनमध्ये परतल्याने अफगाणिस्तान संघाने सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व मिळवले. यानंतर मॅथ्यू वेड (५ धावा), पॅट कमिन्स (३) आणि ॲश्टन गर (२) स्वस्तात माघारी परतले.

क्रिकेटच्या इतिहासात अफगाणिस्तानने ऑस्ट्रेलियाला कोणत्याही फॉरमॅटमध्ये पराभूत करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या पराभवामुळे उपांत्य फेरी गाठण्याच्या ऑस्ट्रेलियाच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. कांगारूंना २४ जून रोजी होणाऱ्या सुपर-८ मधील त्यांच्या शेवटच्या सामन्यात भारताचा पराभव करावा लागेल.

### सुपर ८ च्या गट १ मध्ये चुरस

अफगाणिस्तान विरुद्धच्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाचा पराभव झाल्यानंतर सुपर ८ फेरीच्या गट १ मध्ये चुरस निर्माण झाली आहे. कोणते दोन संघ उपांत्य फेरीत आपले स्थान पक्के करतील, हे आता शेवटच्या २ उरलेल्या सामन्यांद्वारे निश्चित केले जाईल. या गटातील एक सामना भारतीय संघ ऑस्ट्रेलियाशी खेळेल तर दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तानचा संघ बांगलादेशशी खेळेल. सध्या या गटातील गुणतालिकेत भारतीय संघ ४ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे, तर ऑस्ट्रेलिया २ गुणांसह दुस-या स्थानावर आहे, तर अफगाण संघही २ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. त्याचबरोबर बांगलादेश संघाला २ सामन्यांनंतरही आपले खाते उघडण्यात यश आलेले नाही.

### भारतासाठीही धोका?

ऑस्ट्रेलियाच्या पराभवामुळे भारताचेही नुकसान होऊ शकते. वास्तविक, भारतीय संघ पुढील सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून हरला तर दोन्ही संघांचे गुण ४-४ होतील. दुसरीकडे, अफगाणिस्तानने बांगलादेशविरुद्धचा त्यांचा शेवटचा जिंकल्यास तिन्ही संघांचे गुण ४-४ होतील. अशा परिस्थितीत ज्या संघाचा रनरेट चांगला असेल तो उपांत्य फेरीत पोहोचेल. सध्या टीम इंडियाचा नेट रनरेट +२४२५ आहे. इतर संघांपेक्षा तो खूपच चांगला आहे. पण क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ आहे, अशा परिस्थितीत येथे काहीही होऊ शकते, जर ऑस्ट्रेलिया भारताविरुद्ध मोठा विजय मिळवण्यात यशस्वी झाला तर टीम इंडियासाठी समीकरण बिघडू शकते.





# ‘बोलायचं राहून गेलं’ या मराठी चित्रपटाची घोषणा

आजवर प्रेमकथांवर आधारलेल्या बऱ्याच चित्रपटांनी रसिकांचं मनोरंजन करण्यात यश मिळवलं आहे. रसिकांची आवड ओळखून लेखक-दिग्दर्शकांनीही गुलाबी प्रेमाचे वेगवेगळे पैलू रुपेरी पडद्यावर सादर केले आहेत. तरीही प्रेमाची गोडी तसूभरही कमी झालेली नाही. प्रेमाच्या अप्रकाशित पैलूंवर आधारलेल्या एका नवीन चित्रपटाची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. ‘बोलायचं राहून गेलं’ या चित्रपटात प्रेक्षकांना एक अजब-गजब प्रेमकहाणी पाहायला मिळणार आहे.

जिजा फिल्म्सची निर्मिती असलेल्या या चित्रपटाचे निर्माते अभिषेक उत्कर्ष कोळी आणि सुरेश मगनलाल प्रजापती आहेत. निर्मितीसोबतच कथा, पटकथा लेखन आणि दिग्दर्शनाची जबाबदारीही अभिषेक उत्कर्ष कोळी यांनी सांभाळली आहे. नुकताच या चित्रपटाचा मुहूर्त करण्यात आला. याप्रसंगी निर्माते, दिग्दर्शक, कलाकारांसोबत तंत्रज्ञही उपस्थित होते. या चित्रपटात अभिषेक कोळी एक अनोखी लव्ह स्टोरी सादर करणार असल्याचं ‘बोलायचं राहून गेलं’ या शीर्षकावरून सहज लक्षात येतं. इतर प्रेमकथांपेक्षा हा चित्रपट वेगळ्या वाटेने जाणारा असल्याचे संकेत शीर्षकावरून मिळतात.

शीर्षकाला अनुसरून अभिषेक यांनी या चित्रपटाची पटकथा लिहिली असून, आजतागायत कधीही समोर न आलेल्या पैलूंचा समावेश केला आहे. दर्जेदार निर्मिती मूल्यांच्या साथीने सुमधूर गीत-संगीताची किनार जोडण्यात आल्याने ‘बोलायचं राहून गेलं’च्या रूपात प्रेक्षकांना एक संगीतप्रधान प्रेमकथा पाहायला मिळेल असा विश्वास अभिषेक कोळी यांनी व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, एक फ्रेश कथानक ‘बोलायचं राहून गेलं’ या चित्रपटात आहे. तरुणाईसोबतच सर्व वयोगटांतील रसिकांना नजरेसमोर ठेवून बनवलेला हा एक परिपूर्ण कौटुंबिक सिनेमा आहे. रोमान्स, कॉमेडी, इमोशन्सचा अद्भूत संगम असलेली अलौकीक प्रेमकथा या चित्रपटाचा प्लस पॉइंट आहे. ‘बोलायचं राहून गेलं’ची कथा शेवटच्या क्षणापर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवेल असेही अभिषेक कोळी म्हणाले.

या चित्रपटात अभिजीत आमकर, गणेश यादव, अरुण नलावडे, उमेश राव, अस्मिता सुर्वे आदी कलाकार आहेत. संगीतकार कुणाल-करण या चित्रपटातील गीतांना संगीत देणार आहेत. निलेश वि. गमरे या चित्रपटाचे कार्यकारी निर्माता असून संकेत बारे लाइन प्रोड्युसर आहेत. लवकरच या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात करण्यात येणार आहे.







ऑक्सफर्ड इंग्लिश विद्यालयाने दहावीच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. त्यानिमित्ताने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा शाळेचे संस्थापक मा. आमदार रविंद्र फाटक यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका पद्मजा कुणकर्णी (माध्यमिक), रेखा पाटील (प्राथमिक), शिक्षक वर्ग आणि पालक वर्ग उपस्थित होते.

### संजय घाडीगावकरांचा मनसेला टोला

# ज्यांचे महाराष्ट्राने प्रत्येक निवडणुकीत कपडे उतरवले आहेत ते उद्धव साहेबांचे कपडे काय उतरवणार?

ठाणे : ज्यांचे महाराष्ट्राने प्रत्येक निवडणुकीत कपडे उतरवले आहेत ते उद्धव साहेबांचे कपडे काय उतरवणार? असा सणसणीत टोला ठाकरेंच्या शिवसेनेचे संजय घाडीगावकर यांनी ठाणे मनसेच्या नेत्यांना लगावला आहे.

ठाणे मनसेच्या नेत्यांनी ठाण्यात उद्धव ठाकरे यांचे विरोधात बॅनर लावल्यानंतर संजय घाडीगावकर आक्रमक झाले असून त्यांनी जशास तसे प्रत्युत्तर दिले आहे. याबाबत त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केले आहे. यामध्ये घाडीगावकर यांनी म्हटले आहे की,मनसे स्थापन झाल्यापासून त्यांचा रडीचा डाव सुरू आहे... उद्धव साहेबांवर खार खाऊन केवळ उद्धव ठाकरेंना राजकारणात टार्गेट करण्यासाठीच हा पक्ष स्थापन झाला आहे का अशी शंका येते.

बिन शर्ट पाठिंबा देणारे महाराष्ट्रावर आक्रमण होताना गप्प राहतात आणि उद्धव साहेबांना मात्र टार्गेट करतात... भाजप मिंधे गट ही गिधाडे बनून जेव्हा मातोश्रीवर हल्लाबोल करतात तेव्हा दुर्दैवाने बिनशर्ट वाले सुद्धा त्या गिधाडांच्या टोळीत सामील होतात.



ज्यांचे बाळासाहेबांनी हयात असताना नकली म्हणून कपडे उतरवले आहेत. ते उद्धव साहेबांचे कपडे या निवडणुकीत काय उतरवणार? महाराष्ट्राने प्रत्येक निवडणुकीत बिनशर्ट वाल्यांना उघडे पाडले आहे.

तुमच्याकडे पक्ष होता, चिन्ह होत तरी तुम्ही एकही उमेदवार उभा केला नाही केवळ उद्धव साहेबांचे उमेदवार पाडण्यासाठी मिंधे आणि भाजपला बिनशर्ट पाठिंबा दिला.

उद्धव साहेबांचा पक्ष आणि चिन्ह चोरीला गेलेले असतानाही त्यांनी ९ खासदार निवडून आणले... खरं तर त्यांनी भाजप आणि टोळीच्या नाकी नऊ आणले आहेत. ओरिजनल ठाकरे ब्रँड उद्धव बाळासाहेब ठाकरे असे घाडीगावकर यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### ठाण्यातील महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांमुळे कोंडी

# माजिवाडा उड्डाणपुलासह खारेगाव टोलनाका भागात खड्डे

ठाणे : ठाणे, घोडबंदर आणि नाशिक भागातील वाहतूकीसाठी महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या माजिवडा, कापुरबावडी उड्डाण पुलावरील मार्गिकेच्या दुरुस्तीचे काम पावसाळ्यापुर्वी करण्यात आलेली असतानाच, या मार्गावर पहिल्याच पावसात खड्डे पडल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. तसेच मुंबई–नाशिक मार्गावर रस्ते आणि पुल बांधणीची कामे सुरू असून त्यातच या मार्गावर पडलेल्या खड्ड्यांमुळे खारेगाव नाका, माजिवाडा, मुंब्रा बाह्यवळण मार्गावर कोंडी झाल्याचे दिसून आले. ठाणे महापालिका क्षेत्रातील महामार्गावर दरवर्षी पावसाळ्यात खड्डे पडतात. खड्ड्यांमुळे वाहतूकीचा वेग मंदावून कोंडी होते. त्याचा परिणाम, शहरातील अंतर्गत मार्गांवर दिसून येतो. यंदाही हे चित्र कायम असल्याचे शनिवारी दिसून आले.

गेल्या काही दिवसांपासून शहरात पावसाला सुरूवात झाली. परंतु अर्ध्या तासांच्यावर पाऊस पडत नव्हता आणि पावसाचा जोरही फारसा नव्हता. गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून त्याचबरोबर सतत पाऊस सुरू आहे. या पावसामुळे ठाणे, घोडबंदर आणि नाशिक भागातील वाहतूकीसाठी महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या माजिवडा पुलावरील घोडबंदरहून नाशिक आणि मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर खड्डे पडले आहेत. या पुलाच्या दुरुस्तीचे काम पावसाळ्यापुर्वी करण्यात आले होते. मास्टीक पद्धतीने या रस्त्याची बांधणी करण्यात आली होती. परंतु पहिल्याच पावसात रस्त्यावर खड्डे पडल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

या पुलावरून अवजड, हलक्या वाहनांसह दुचाकींची वाहतूक सुरु असते. या सर्व चालकांना खड्डे चुकत प्रवास करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत असून या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची भिती व्यक्त होत आहे. त्याचबरोबर मुंबई–नाशिक मार्गावरील खारेगाव चौकाजवळील रस्त्यावर दरवर्षी खड्डे पडतात आणि कोंडीची समस्या निर्माण होते. यंदाही पहिल्याच पावसात याठिकाणी खड्डे पड़ले असून ते संबंधित विभागाकडून बुजविण्याची कामे सुरु आहेत. या मार्गावर रस्ते आणि पुल बांधणीची कामे सुरू असतानाच, त्यात खारेगाव टोलनाका भागात खड्डे पडल्यामुळे शनिवारी येथे कोंडी झाली. मुंब्रा बाह्य वळण मार्गापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तसेच माजिवाडा येथून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवरही कोंडी झाली होती. यानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाणेकरांना पावसाळ्यात कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागणार असल्याची चिन्हे दिसून येत आहेत.



# घोडबंदर किल्ल्याच्या तळघरात सापडली छुपी खोली

### राज्य पुरातत्व विभागाकडून पाहणी

**भाईंदर : ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याच्या सुशोभीकरणाच्या कामादरम्यान तळघरात छुपी खोली आढळून आली आहे. यामुळे शनिवारी पुरातत्व विभागाकडून किल्ल्याला भेट देऊन तपासणी करण्यात आली.**

मिरा–भाईंदर शहरात ऐतिहासिक असा घोडबंदर किल्ला आहे. हा किल्ला पुरातत्व विभागाकडे नोंदणी कृत आहे.परंतु मागील अनेक वर्षांपासून किल्याची पडझड मोठ्या प्रमाणात होऊ लागली होती.म्हणून पालिकेने राज्य शासनाकडे घोडबंदर किल्ला 'महाराष्ट्र वैभव– राज्य संरक्षित स्मारक योजने' अंतर्गत संगोपनार्थ देण्याची मागणी केली होती.त्याला शासनाने २०१९ साली मंजुरी दिली होती.तदनंतर किल्ल्याचा विकास आराखडा तयार करत, पुरातत्त्व विभागाच्या मदतीने किल्ल्याच्या संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले आहे.यात किल्याच्या बांधणीचे काम पूर्ण झाले असून अवती–भवती असलेल्या परिसराचा विकास केला जात आहे.दरम्यान किल्ल्याच्या मुख्यप्रवेशद्वाराजवळ कमानीसाठी खोदकाम सुरु असताना काही विलक्षण भिंती असलेले तळघर कामगारांना दिसून आले होते.त्यावरून स्थानिक नागरिकांनी याबाबतची माहिती राज्य पुरातत्त्व विभागाला दिली होती.सुरुवातीला ही एक भुयार असल्याचे म्हटले जात होते.

मात्र शनिवारी पुरातत्व विभागातील तज्ञांनी किल्ल्याला भेट देऊन ही छुपी खोली असल्याचे स्पष्ट केले आहे.तर यावरून किल्ला परिसरात असलेल्या इतर वास्तूचा शोध घेतला जात असल्याची माहिती पुरातत्व शास्त्रज्ञांकडून देण्यात आली आहे.घोडबंदर किल्यातील तळघरात आढळून आलेली खोली ही जवळपास तीन बाय तीन (३÷३)फुटाची आहे.यात दिवा ठेवण्यासाठी स्वतंत्र दगडाची खण बनवण्यात आली आहे. प्रामुख्याने या खोलीचा वापर अडचणीच्या प्रसंगी स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी केला जात असल्याचा अंदाज आहे.तर अशा अजून काही खोल्या दिसून येण्याची शक्यता असल्यामुळे येत्या दिवसात मातीचे उत्खनन केले जाणार असल्याचे पुरातत्व शास्त्रज्ञांकडून सांगण्यात आले आहे.

# ठाणे पालिकेने प्रथमच तयार केला पूरस्थितीचा सामना करण्यासाठी पूर जोखीम व्यवस्थापन आराखडा

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रातील पूर जोखीम व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आलेल्या ठाणे शहर कृती आराखडा २०२४चे प्रकाशन शनिवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले. हा आराखडा राज्य सरकार आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोन्मेंट अँड वॉटर (सीईईडब्ल्यू) या आघाडीच्या थिंक टँकच्या सहयोगाने विकसित करण्यात आला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील पूरग्रस्त भागांना प्राधान्य देऊन पूरस्थितीचा सामना करण्यासाठी तयार राहणे आणि जलद प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणेला सुसज्ज करण्याची दिशा मिळणे हा या कृती आराखड्याचा प्रमुख उद्देश आहे.

पूर जोखीम व्यवस्थापनासाठी 'सीईईडब्ल्यू' या संस्थेने तयार केलेला ठाणे शहर कृती आराखडा २०२४ हा सर्वसमावेशक आहे. त्यासाठी संस्थेने अतिशय मेहनत घेतली आहे. अतिरित्त मुख्य सचिव (गृह) आणि ठाणे जिल्ह्याच्या पालक सचिव सुजाता सौनिक यांनी यासंदर्भात पुढाकार घेतला.



त्यातून तयार झालेल्या या कृती आराखड्यामुळे ठाणे महापालिकेच्या यंत्रणेला सुप्रशासनासाठी मदत होणार आहे, असे प्रतिपादन या प्रकाशन कार्यक्रमात महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. यावेळी, नागरिकांना या कृती आराखड्याची माहिती व्हावी यासाठी तयार करण्यात आलेल्या पोस्टरचेही प्रकाशन करण्यात आले.

ठाणे महापालिका क्षेत्राचा विकास होत असताना नैसर्गिक नाल्यांची स्थिती आमूलाग्र बदलली आहे. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने विचार करून भूमिगत मल:निसारण वाहिन्यांचे जाळे उभारण्याचे मोठे आव्हान आता महापालिकेसमोर उभे आहे. त्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी 'सीईईडब्ल्यू' या संस्थेने महापालिकेसाठी तयार केलेला हा कृती आराखडा दिशादर्शक म्हणून काम करेल. नवीन प्रकल्प करताना, डीपीची अमलबजाबणी करताना या कृती आराखड्यातील मुद्दे विचारात घेऊनच निर्णय घेतले जातील, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

या प्रकाशन कार्यक्रमास, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तुषार पवार, उपायुक्त (उद्यान) सचिन पवार, परिवहन सेवेचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, सीईईडब्ल्यूचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी विश्वास चितळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. चेतना नितील, डॉ, राणी शिंदे, उपनगर अभियंता विकास ढोले, गुणवंत झांबरे, कार्यकारी अभियंता सुधीर गायकवाड, वरिष्ठ उद्यान निरिक्षक केदार पाटील, अधिष्ठाता डॉ. राकेश बारोट, डॉ. अनिरुद्ध माळगावकर, डॉ. प्रसाद पाटील उपस्थित होते.

# नवी मुंबई पोलीस भरतीमध्ये काँक्रीटच्या रस्त्यावर धावणीची परिक्षा

पनवेल : नवी मुंबई पोलीस दलातील १८५ पोलीस शिपाई पदांसाठीची भरती प्रक्रियेला रविवार पहाटेपासून सुरुवात झाली. पावसामुळे मैदानात धावणीची परिक्षा घ्यावी कशी असा प्रश्न उभा राहिल्याने पोलीस आयुक्तांनी रोडपाली मुख्यालयासमोरील काँक्रीटच्या रस्त्यावर १६०० मीटर धावणीसाठी रस्त्यालाच धावपट्टी करुन त्यावर तोडगा काढला. रविवारी पहाटे पाच वाजल्यापासून साडेतीनशे पोलीसांच्या बंदोबस्तामध्ये पोलीस भरतीला सुरुवात झाली. रोडपाली लिंकरोडवरील काँक्रीटच्या रस्त्यावर धावणी होणार असल्याने हा रस्ता वाहनांसाठी बंद करण्यात आला होता. पावसाळ्यात मैदानात झालेल्या चिखलात १६०० मीटरसारखी धावणीची परिक्षा घेण्याचे आव्हान नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्यासमोर होते. यावेळच्या भरती प्रक्रियेत ५,९८४ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. अर्जदारांमध्ये मोठ्या प्रमाणात उच्चशिक्षित व सुशिक्षित मुलांचा समावेश आहे. आधुनिक परिमापकांचा वापर करुन उमेदवारांची उंची, वजन, छातीचे मोजमाप घेतल्यानंतर रविवारी पहिल्या दिवशी सातशे उमेदवारांची चाचणी घेण्यात आली.

बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या उमेदवारांना राहण्याची, जेवणाची व चहापाण्याची सोय नवी मुंबई पोलीस दलाने केली होती. रविवारी पहाटे चार वाजल्यापासून पोलीस बंदोबस्त रोडपाली मुख्यालयासमोर तैनात करण्यात आला होता. उमेदवारांना भरती प्रक्रियेत कमीकमीत त्रास व्हावा असा विचार करुन पोलीस आयुक्त भारंबे, पोलीस उपायुक्त संजय पाटील यांनी नियोजन केल्याचे रविवारी दिसले. पुढील पाच दिवस भरती प्रक्रिया सूरु असल्याने रोडपाली लिंकरोडवरील वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे.



कोकण पदवीधर मतदार संघाच्या २६ जून रोजी होणाऱ्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार ॲड.निरंजन डावखरे पहिल्या फेरीतच विजयी होतील असा विश्वास आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला. ठाण्यातील कोपरी परिसरातील शंकर मंदिर हॉल येथे शनिवारी सायंकाळी आयोजित केलेल्या मेळाव्यात आमदार संजय केळकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी भाजपाचे ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, भाजपाचे ठाणे जिल्हा सरचिटणीस कैलाश म्हात्रे, ज्येष्ठ माजी नगरसेवक लक्ष्मण टिकमाणी, ज्येष्ठ माजी नगरसेविका रेखा पाटील, माजी नगरसेवक भरत चव्हाण, भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव ओमकार चव्हाण तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते पदवीधर व शिक्षक उपस्थित होते. (छाया : मनोज सिंह)

# मुंब्रावासियांचा पाण्यासाठी तिरडी मोर्चा

### संतप्त नागरिकांनी फोडली मडकी

ठाणे : गेल्या पंधरा दिवसांपासून मुंब्रा परिसरात पाणी पुरवठा होत नसल्याचा आरोप येथील नागरिकांनी शनिवारी पालिका प्रभाग समिती कार्यालयावर तिरडी मोर्चा काढला. या दरम्यान, पालिका कार्यालयाच्या दारात मडकी फोडून नागरिकांनी संताप व्यक्त केला. तसेच येत्या मंगळवार पर्यंत पाणीपुरवठा सुरळीत झाला नाहीतर, पालिका मुख्यालयावर बुधवारी मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला. धरण क्षेत्रातील पाणी साठ्याचे नियोजन करण्यासाठी दहा टक्के कपात लागू करण्यात आली आहे.

या कपातीमुळे ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून पाणी टंचाईची समस्या निर्माण होत आहे. तर, मुंब्रा परिसरात गेल्या १५ दिवसांपासून पाणीच येत नसल्यामुळे टँकरद्वारे पाणी घ्यावे लागत आहे. याविरोधात पालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते शानू पठाण यांनी आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले होते. त्यावेळेस पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन पालिका अधिकाऱ्यांनी दिले होते. यानंतरही पाण्याचा पुरवठा सुरळीत झालेला नाही. त्यानिषेधार्थ सामाजिक कार्यकर्त्या मर्जिया पठाण नागरिकांनी शनिवारी भर पावसात पालिका प्रभाग समिती कार्यालयावर तिरडी मोर्चा काढला. यामध्ये नागरिक मोठ्या सहभागी झाले होते. मोर्चेकऱ्यांनी पाणीपुरवठा कार्यालयावर धडक दिल्यानंतर कार्यालयाला बंद असल्याचे दिसल्याने संतप्त झालेल्या मोर्चेकऱ्यांनी कार्यालयाच्या दारात मडकी फोडली. तसेच, गेटवर चढून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी मोर्चेकऱ्यांना अडविले.

# कंटेनरच्या धडकेत तरुण–तरुणीचा मृत्यू

ठाणे : मुंबई नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाका भागात दुचाकीला कंटेनरची धडक बसल्याने कंटेनरचे चाक शरिरावरून गेल्याने तरुण-तरुणीचा मृत्यू झाला आहे. अमान सय्यद (१९) आणि अर्चना पगारे (२०) अशी मृतांची नावे आहेत. दोघेही ठाण्यात कामाला असून ते घरी परतत असताना हा अपघात झाला आहे. याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी कंटेनर चालक जितेंद्रकुमार यादव (२८) याला अटक केली आहे. ठाण्यातील घोडबंदर भागातील एका कंपनीमध्ये अमान आणि अर्चना काम करतात. अमान हा मुंब्रा येथे त्याच्या कुटुंबासोबत तर अर्चना ही डोंबिवली भागात राहात होती. अमान त्याच्या दुचाकीने कामावर जात असतो. शुक्रवारी रात्री अमान हा त्याच्या दुचाकीने घरी परतत होती. त्यावेळी अर्चनाही त्याच्यासोबत दुचाकीने घरी जाण्यासाठी निघाली. ते दुचाकीने खारेगाव टोलनाका येथे आले असता, भरधाव कंटेनरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे अमान आणि अर्चना या दोघांच्याही शरिरावरून कंटेनरची चाके गेली.

# वाशी रुग्णालयात आयुष्यमान भारत डिजीटल मिशन




### श्रीम. दिप्ती मुखर्जी व विक्रम पगारीयांची पाहणी

**नवी मुंबई : आयुष्यमान भारत डिजीटल मिशनच्या कामकाजाची पाहणी करण्याकरिता आज राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम.दिप्ती गौर मुखर्जी आणि संचालक विक्रम पगारीया यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी सार्वजनिक रूग्णालयास भेट दिली. याप्रसंगी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. राजेश म्हात्रे उपस्थित होते.**

सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे आयुष्यमान भारत डिजीटल मिशनच्या अंतर्गत आभा ॲपव्दारे रुग्णांची आभा नोंदणी करणे, त्यांचे टोकन नंबर तयार करणे व त्याव्दारे आभा नोंदणी कक्षातून त्वरित केसपेपर मिळविणे अशा कामांबाबतचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यावेळी महापालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या आरोग्य, पाणी पुरवठा, स्वच्छ भारत मिशन आदी विविध उपक्रमांची सविस्तर माहिती आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी उपस्थितांना दिली तसेच नजिकच्या काळात रुग्णालयविषयक सर्व कामकाजाचे संगणकीकरण करण्यात येत असल्याचेही नमूद केले.

राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम.दिप्ती गौर मुखर्जी यांनी सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे आयुष्यमान भारत डिजीटल मिशनच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करुन हे कामकाज प्रभावीपणे होत असल्याचे नमूद केले. या योजनेचे पुढील टप्प्यातील कामकाज करणेबाबत त्यांनी मार्गदर्शन केले व राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणामार्फत नमुंमपाला याकामी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल असे सांगितले.

या भेटी दरम्यान कोपरखैरणे येथे जूनी क्षेपणभूमी शास्त्रोक्तरित्या बंद करून त्याठिकाणी बनविण्यात आलेल्या निसर्गेद्यानाला, तेथील मियावाकी जंगल परिसराला तसेच त्या जवळील टाकाऊतून टिकाऊ संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या आकांक्षी शौचालयाचीही पाहणी करून नवी मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरणशील नाविन्यपूर्ण कामांची प्रशंसा केली.

# सायन पनवेल महामार्गावर नवी मुंबई पालिकेची लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीम

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातून जाणारा सायन पनवेल महामार्ग हा जरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असला तरी या मार्गावरून दररोज बाहेरच्या शहरातील हजारो नागरिक ये – जा करीत असल्याने तो स्वच्छ असणे नवी मुंबईच्या स्वच्छ शहर मानांकनासाठी महत्वाचे आहे. त्यादृष्टीने आज नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रत्यक्ष सहभागातून सायन पनवेल महामार्गावर बेलापूर ते वाशी मार्गावर दोन्ही बाजूकडे सखोल स्वच्छता मोहीम लोकसहभागातून राबविण्यात आली.

यामध्ये अतिरिक्त आयुक्त श्री सुनील पवार व शिरीष आरदवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ.अजय गडदे, परिमंडळ १ चे उपायुक्त सोमनाथ पोटरे, अति. शहर अभियंता अरविंद शिंदे तसेच सर्व विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता, स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक तसेच इतर अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतामित्र यांचेसह नागरिक व एनएसएस विद्यार्थी मोठ्या संख्येने



सहभागी होते.

सायन पनवेल महामार्गावर उरण फाटा येथे बेलापूर व नेरूळ विभागाच्या अख्यत्यारितील अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतामित्र, नागरिक व एनएसएस विद्यार्थी एकत्र जमले. याठिकाणी आयुक्तांनी सायन पनवेल महामार्गावरील सखोल स्वच्छता मोहीमेचे महत्व सांगत यापुढील काळात शहरातील मुख्य रस्ते तसेच विविध भागात शनिवार व रविवारी एकत्र येऊन लोकसहभागातून स्वच्छता मोहीमा राबविण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. या मोहीमांमध्ये नागरिकांच्या सहभागाला प्राधान्य देण्याची भूमिका विषद करीत नागरिकांनी यामध्ये स्वयंस्फुर्तीने सहभागी होऊन शहर स्वच्छतेत सक्रिय योगदान द्यावे असे आवाहन केले.

याठिकाणी उपस्थितांनी आयुक्त महोदयांसमवेत स्वच्छतेची सामुहिक शपथ ग्रहण केली आणि आयुक्तांसमवेत सर्वजणांनी सायन पनवेल महामार्गाकडेच्या प्लास्टिक, कागद व इतर कचऱ्याच्या संकलनाला सुरूवात केली. तेथील उड्डाणपुलाखालील जागेतही सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सायन पनवेल महामार्गावरील नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील बेलापूर, नेरूळ, तुर्भे, वाशी विभाग कार्यालयांच्या वतीने त्या त्या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या. आयुक्तांनी याही ठिकाणी भेट देत तेथील स्वच्छता मोहीमेत प्रत्यक्ष सहभाग घेतला. या मोहीमेत इतरही विभाग कार्यालयांचे अधिकारी, कर्मचारी, स्वच्छताकर्मी उत्साहाने सहभागी झाले होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१